**ठळक बातम्या**

- जगातला तणाव आणि अस्थिरतेच्या काळात योग साधना शांततेचा मार्ग दाखवत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- देशातलं पहिलं योग धोरण उत्तराखंडकडून जाहीर, जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उत्साह

- इस्रायलनं केलेल्या हल्ल्यात आतापर्यंत किमान ४०० जण मृत्यूमुखी पडल्याचा इराणचा दावा

**आणि**

- तळाच्या फलंदाजांच्या खराब कामगिरीमुळं इंग्लंड विरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताच्या पहिल्या डावात ४७१ धावा

**<><><><><>**

जगाच्या विविध भागांमध्ये वाढलेल्या तणाव, अशांतता आणि अस्थिरतेच्या काळात योग साधना शांततेचा मार्ग देत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. विशाखापट्टणम मध्ये आज ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**होल्ड बाईट : प्रधानमंत्री PAUSE BUTTON (00.27 Sec.)**

योग सगळ्यांसाठी आहे असा संदेश आज जगाच्या कानाकोपऱ्यांतून येत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं. या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची एक पृथ्वी, एक आरोग्य यासाठी योग ही संकल्पना पृथ्वीवरच्या प्रत्येक घटकाचं आरोग्य परस्परांशी जोडलेलं असल्याची प्रचिती देते, असं त्यांनी सांगितलं.

आयुष मंत्रालयाच्या वतीनं आयोजित या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उपमुख्यमंत्री पवन

कल्याण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात ३ लाख योगसाधक सहभागी झाले होते.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उधमपूर इथं तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह अहमदाबाद इथं योग साधना कार्यक्रमात सहभागी झाले. सीमा सुरक्षा दलाच्या वतीनं पाकिस्तान सीमेलगतच्या अटारी इथं एका विशेष योग सत्राचं आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमात राष्ट्राभिमान आणि आरोग्याबद्दलच्या जागरूकतेचं अनोखं दर्शन घडलं.

**<><><><><>**

११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन राज्यभरात मोठ्या उत्साहात आणि विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. योगदिनानिमित्त मुंबईत राजभवन इथं आयोजित योगसत्रात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सहभाग घेतला. सर्व विद्यापीठांमध्ये योगाभ्यास सुरू करण्याबाबत कुलगुरूंशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारकरी भक्तीयोग कार्यक्रमात वारकऱ्यांसोबत योग साधना केली. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले.

**- - होल़्ड- मुख्यमंत्री-**

**<><><><><>**

देशातलं पहिलं योग धोरण उत्तराखंड सरकारनं आज जाहीर केलं. २०३० पर्यंत राज्यात ५ नवीन मोठी योग केंद्र स्थापन करण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. तसंच पुढच्यावर्षीच्या मार्चपर्यंत सर्व आयुष आरोग्य केंद्रात योग सुविधा उपलब्ध केल्या जातील. याशिवाय योग आणि ध्यान केंद्र विकसित करण्यासाठी राज्य सरकार २० लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत देणार आहे. योग, ध्यान, निसर्गोपचार या क्षेत्रात संशोधनासाठी सरकार १० लाख रुपयांचं अर्थसहाय्य देणार आहे.

हे धोरण उत्तराखंडला योग आणि आरोग्य कल्याण क्षेत्रात जागतिक राजधानी म्हणून प्रस्थापित करणारा महत्वाचा टप्पा ठरेल असं उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय योग दिवस देशोदेशी विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. लंडन शहरातल्या महत्त्वाच्या स्थळांवर तसंच ऑक्सफोर्ड, केंब्रिज आणि साऊदम्टन विद्यापीठांमधे विविध कार्यक्षेत्रातल्या लोकांनी योगदिनानिमित्त कार्यक्रमात भाग घेतला. न्यूयॉर्कच्या प्रसिद्ध टाईम्स स्क्वेअर मधे योगदिन साजरा झाला. जपानमधे टोकियो इथल्या त्सुकिजी होंग्वानजी बौद्ध मंदिरात आयोजित योगसाधना कार्यक्रमाचं उद्घाटन जपानी प्रधानमंत्र्यांच्या पत्नी शिगेरु, इशिबा, योशिको इशिबा यांच्या हस्ते झालं.

चीनमध्ये बीजिंग, शांघायसह अनेक शहरांमध्ये योगसत्र आयोजित केली होती. तिबेटमध्ये कैलास मानसरोवर यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीनं उत्साहानं योगाच्या प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग नोंदवल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली आहे.

रियाध इथं भारतीय दूतावासानं प्रिन्स फैसल बिन फाहद स्टेडियममध्ये योग दिन साजरा केला. मस्कत मध्येही भारतीय दूतावासानं अल कुरम नॅचरल पार्क इथं सकाळी योगाची प्रात्यक्षिकं केली.

सिंगापूर आणि म्यानमार मध्ये स्थानिक जनता उत्साहानं योगदिनाच्या कार्यक्रमात सहभागी झाली होती.

<><><><><>

बिहारमध्ये सरकारनं ज्येष्ठ नागरिक, विधवा आणि दिव्यांग व्यक्तींच्या निवृत्ती वेतनात वाढ करायचा निर्णय घेतला आहे. सामाजिक सुरक्षा निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत निवृत्ती वेतनात ७०० रुपयांनी वाढ होणार आहे. पुढच्या

महिन्यापासून लाभार्थ्यांना अकराशे रुपये वाढीव निवृत्ती वेतन मिळेल असं बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

इस्राइलनं केलेल्या हल्ल्यात गेल्या ९ दिवसात किमान ४०० जणांचा मृत्यू झाल्याचा दावा इराणनं केला आहे. याशिवाय ३ हजारांहून अधिक जण जखमी झाल्याचं इराणच्या आरोग्य मंत्रालयाचे प्रवक्ते हुसेन केर्मानपूर म्हणाले.

मृतांमध्ये बहुतांश लोक सामान्य नागरिक असून यात ५४ महिला आणि मुलांचा समावेश आहे.

इस्राइलनं केलेल्या हल्ल्यात बचाव कार्यासाठी वापरात असलेलं हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाल्याचं रेड क्रिसेंट सोसायटीनं म्हटलं आहे.

रात्रभरात इराणचे ३ वरिष्ठ लष्करी अधिकारी ठार केल्याचा दावा इस्राइलच्या लष्करानं केला आहे. इराण आणि हमास यांच्यातल्या प्रमुख समन्वयकाचा यात समावेश आहे.

इस्रायलने इराणच्या क्षेपणास्त्रं साठवण केंद्र आणि पायाभूत सुविधांवर सातत्याने हल्ले सुरू ठेवले आहेत. या हल्ल्याला इराणने प्रत्युत्तर दिल्याचं वृत्त आहे. इराणने इस्रायलच्या बीरशेबा आणि हैफा या शहरांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. हैफामधे २३ लोक जखमी झाल्याचं इस्रायलने म्हटलं आहे.

इस्रायल आणि इराण संघर्ष राजनैतिक चर्चेच्या माध्यमातून सोडवणं युरोपच्या क्षमतेच्या बाहेर आहे, अशी टीका अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. इराणला युरोपशी चर्चा करण्याची इच्छा नाही त्यांचा अमेरिकेवर विश्वास आहे, असं ट्रम्प म्हणाले.

**<><><><><>**

इराणच्या अणुऊर्जा प्रकल्पांवर इस्राएलनं केलेल्या हल्ल्यांमुळे अणु प्रदूषणाचा धोका असल्याचं आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेचे महासंचालक राफेल

ग्रोसी यांनी म्हटलं आहे. इराणमधल्या अणुप्रकल्पांवर झालेल्या हल्ल्यांमुळे तिथल्या आण्विक सुरक्षेत घट झाली आहे, मात्र गळती होणाऱ्या क्ष-किरणांनी अजूनही धोकादायक पातळी ओलांडली नसल्याचं ग्रोसी यांनी सुरक्षा परिषदेच्या आपत्कालीन बैठकीत सांगितलं.

<><><><><>

ऑपरेशन सिंधु अंतर्गत इराणमधून २९० भारतीय नागरिकांना घेऊन एक विमान काल रात्री नवी दिल्लीत पोहोचलं. इराणमधल्या भारतीय नागरिकांना, तेहरानमधल्या भारतीय दूतावासाशी आणि नवी दिल्लीतल्या परराष्ट्र मंत्रालयाच्या २४ तास सुरू असलेल्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचा सल्ला देण्यात आला आहे. ऑपरेशन सिंधुमार्फत नेपाळ आणि श्रीलंका या शेजारी देशांच्या विनंतीवरुन त्यांच्या नागरिकांनाही परत आणण्यात येणार आहे.

<><><><><>

इंग्लंडमधल्या हेडींग्ले इथं भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरु असलेल्या तेंडुलकर-अँडरसन चषक पाच सामन्यांच्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारताचा पहिला डाव ४७१ धावांवर संपला. त्याआधी कालच्या ३ बाद ३५९ धावसंख्येवरुन आज भारताच्या डावाला सुरुवात झाली. कालच्या शतकवीर यशस्वी जयस्वाल आणि शुभमन गिल पाठोपाठ आज ऋषभ पंतनंही आपलं शतक झळकावलं. मात्र, निवडक फलंदाजांच्या चांगल्या खेळी वगळता भारताच्या इतर फलंदाजांनी निराशा केल्यानं एकावेळी ४ बाद ४३० असा सुस्थितीत असणारा भारताचा डाव ४७१ धावांत आटोपला. इंग्लंडच्या बेन स्टोक्सनं ६६ धावांत ४ तर जोश टंगनं ८६ धावांत भारताचे ४ गडी बाद केले. पावसामुळं इंग्लंडचा डाव उशिरा सुरू झाला. इंग्लंडचा सलामीवीर झॅक क्राऊली पहिल्याच षटकात एक चौकार ठोकून बाद झाला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या १ बाद ४१ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

व्हिएतनामच्या वुंग ताऊ इथं सुरु असलेल्या २३ वर्षांखालच्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या महिला कुस्तीपटूंनी सांघिक विजयाची नोंद केली आहे. सर्व गटांमध्ये विजय संपादन करताना महिला कुस्तीपटूंनी ४ सुवर्ण आणि ५ रौप्य पदकं पटकावली. भारताच्या प्रियांशी प्रजापतनं ५० किलो वजनी गटात, रीनानं ५५ किलो वजनी गटात, सृष्टीनं ६८ किलो गटात तर प्रियानं ७६ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं.

//<><><><><>//